ISSN : 2278-8204

History
Dr. Y. M. S

INTERNATIONAL MONTHLY RESEARCH JOURNAL FOR ALL

# AKSHARDEEP

Year - IV
October - 2015

*Editor*
*Ganesh Lahane*

Jalkot, Dist.
r
Nashik
ni
size - 13,
नेबंध हा
ध्ये टाईप
या तशी
- रु.



# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Terrorism And Human Rights | Ardale S. D. & Kurhe S. B. | 01 |
| 2. | A Role Of Agriculture In Indian Economy | Jadhav Sandeep | 02 |
| 3. | Knowledge Management and Its Three Pillars use in Academic Library | Ubhale Vilas | 04 |
| 4. | Emotional Maturity among Highly Educated and Low Educated Male and Female. | Nila Pratibha | 08 |
| 5. | नरेंद्र कोहली के आतंक उपन्यास में पुरुष मानसिकता | भुरे बालाजी | 10 |
| 6. | **स्त्री विमर्श : अवधारणा एवं स्वरूप** | **शेलदरकर गायत्री** | 12 |
| 7. | **भारतीय स्वातंत्र्याचा महामानव महात्मा गांधी : एक आकलन** | **धोंड श्रीहरी** | 14 |
| 8. | **मराठी ग्रामीण / प्रादेशिक कादंबरी** | **धस श्रीराम** | 17 |
| 9. | स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण साहित्याचे वेगळेपण | मुनगेलवार अनिल | 19 |
| 10. | जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य | भानुसे विठ्ठल | 21 |
| 11. | राजन गवस यांच्या 'कळप' आणि 'तणकट' या कादंबऱ्यातील मूल्यविचार | चव्हाण अंकुशकुमार | 26 |
| 12. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शिक्षण विषयक विचार | जाधव सूर्यप्रकाश | 33 |
| 13. | वाणिज्य शिक्षणाची दिशा व अपेक्षा | वजीर प्रभाकर | 38 |
| 14. | स्वातंत्र्य संग्रामातील आदिवासी समाजाचे योगदान | वळवी यशवंत | 41 |
| 15. | महात्मा ज्योतीराव फुल्यांचे स्त्रीशिक्षण विषयक कार्य आणि योगदान | धांडेकर रीता | 43 |
| 16. | ग्रामीण विकासाचे लेखामेंठा प्रारूप | पिल्लेवान कुंदन | 48 |
| 17. | माहितीचा अधिकार २००५ | बने रेखा व भागवत डी. आर. | 51 |
| 18. | सामाजिक न्याय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | सोनाळे चंदन | 54 |
| 19. | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | मुळूक एस. एस. | 57 |
| 20. | मध्ययुगीन भारतातील हिन्दु स्त्रीचे सामाजीक जीवन | साळुंके वाय. एम. | 60 |
| 21. | वैदिक कालीन सामाजिक जीवन | चव्हाण विजय | 65 |
| 22. | भारतीय स्वातंत्र्य युद्धातील आर्यपुरूष | केमटवाड व्ही. डी. | 70 |

Research Paper
In
History

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

60
ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

# मध्ययुगीन भारतातील हिन्दु स्त्रीचे सामाजिक जीवन

प्रा. डॉ. वाय एम. साळुंके
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
ओझर मिग, ता. निफाड जि. नाशिक

प्राचीन काळात मध्ययुगापुर्वी भारतातील सामाजिक जीवनात स्त्रीयांना मानाचे स्थान होते. कुटूंबात स्त्री यांना आदराने वागविले जाई. स्त्री ही कुटूंबातील प्रमुख हालचालीचे केंद्र स्थान मानले जाई त्यामुळे कुटूंबात स्त्रीचे स्थान मानाचे व अधिकाराचे होते.

मध्ययुगातील भारतीय समाजातील हिन्दू स्त्रीची अवस्था दयनीय व शोचनीय होती. कारण याच कालखंडात भारतावर मुस्लीम शासकांच्या आक्रमणामुळे स्त्रीची अवस्था निरंतर ऱ्हासाकडे अग्रेसर होत होती. हिंदू समाजात स्त्रीचे जीवन सर्वस्वी पुरूषावर अवलंबून होते. मुलगी म्हणून ती वडीलांच्या नियंत्रणाखाली मोठी होत असे. विवाहानंतर ती स्त्री पतीच्या आदेशाचे निरंतर पालन करीत होती. वृद्धावस्थामध्ये विधवा झाली तर मुलांच्या अधिपत्याखाली भारतीय स्त्रीला जीवन जगावे लागत होते. प्राचीन धार्मिक ग्रंथानुसार स्त्रीला पुरूषापेक्षा कमी अधिकार मिळाले होते. पुराणानुसार व्यभिचार व अपराधी स्त्रीला मृत्यूदंड दिला जात होता. कात्यायनाने लिहिले आहे की, पुरूषाच्या तुलनेत स्त्रिला जास्त दंडित केले जात असे[1] मात्र धार्मिक अधिकार पुरूषांप्रमाणेच होते. याच काळात राजस्थानमधील स्त्रियांची स्थिती अत्यंत खराब होती. जन्माच्या वेळी विष, तरूण अवस्थेमध्ये अग्नीच्या वणव्याप्रमाणे स्त्रीचे जीवन होते. हिंदू धर्मावर मुस्लीम समाजाचा व्यापक प्रभाव पडलेला होता.

मध्ययुगीन काळात स्त्रीचा पोशाखा साडी, चोळी, लहंगा इत्यादी वस्त्र परिधान करित होत्या. अनेक रंगीत कपड्यांचा वापर या काळात होत असे. शरीरावर अनेक आभूषणे व फुलांची सुंदर कलाकृती परिधान करणे पसंत करीत होते. दागीने सोने, चांदी, रत्न, हिरे, मोती इत्यादीचे राहत असे. याच काळात मुस्लीम स्त्रियांची स्थिती अत्यंत खराब झालेली होते. अमीर खुसरोने स्त्रीला कामलोलुपतेचे स्थान दिले आहे. चेहऱ्यावर परदा घेण्याची पद्धत होती. श्रीमंत, समृद्धशील कुटूंबातील स्त्री परदा घेत असे. निर्धन स्त्रिया, ग्रामीण क्षेत्रातील स्त्रिया आर्थिक कारणामुळे परदा घेत नसे. हिन्दू स्त्रिया धार्मिक कर्तव्याच्या कारणामुळे परदा घेत होत्या. चेहऱ्यावर परदा न घेणे हिन्दू स्त्रियांकरिता निंदनीय मानले जात होते. दक्षिण भारतामध्ये पडद्याची प्रथा नव्हती. या ठिकाणी मुस्लीमांचा हिन्दू समाजावर जास्त प्रभाव पडलेला नव्हता. हिन्दू समाजामध्ये चेहऱ्यावर पदर घेणे हे उच्च प्रतिष्ठेचे लक्षण समजण्यात आले होते. मनूची या विचारवंतानुसार, परदा प्रथेचे मुस्लीम समाजामध्ये दृढतेने पालन केले जात होते. रजिया सुलतान हिने स्त्रियांकरिता अनेक सुधारणावादी तत्वांची निर्मिती केली. फिरोज तुगलक या सुलतानने मुस्लीम स्त्रियांना परदा घेण्याकरिता बाध्य केले होते व संताच्या कबरीवर जाण्यास मज्जाव केला होता. स्त्रियांसोबत समाजामध्ये मृदु व्यवहार केला जात होता. या काळात भारतामध्ये स्त्रियांची स्थिती वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये सारखी नव्हती.[2] ग्रामीण भागातील शेतकऱ्यांकरिता कोणत्याही साधनाची संधी या काळात स्त्रियांना नव्हती. समाजात बहुविवाहाची पद्धत सुरू होती. राजे, महाराजे, श्रीमंत व्यक्ती अनेक विवाह करीत होते. पंधराव्या शतकामध्ये बिहारमधील अनेक बुद्धीमानी स्त्रिया विभिन्न कलेमध्ये पारंगत होत्या. अनेक समाजमान्य अधिकार त्यांना प्राप्त झाले होते.

आर्थिक क्षेत्रामध्ये स्त्री ही पतीच्या अर्ध्या संपत्तीची मालकीण समजली जात होती. विवाहाच्या प्रसंगी पती पत्नीला वचन देत होता की, आर्थिक क्षेत्रासंबंधी सदा तत्परतेने रक्षण करण्याकरिता सदैव तत्पर राहणार. धार्मिक ग्रंथामध्ये स्त्रियांच्या संपत्तीच्या अधिकाराचा उल्लेख केलेला नाही. हिंदू समाजातील गरीब वर्गातील स्त्रिया आपल्या

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

पतीसोबत काम करून संपत्ती मिळवित होती. काही स्त्रिया राजमहालात दासीचे काम करीत होत्या.

**ऐतिहासिक आणि वर्तमान भारतीय स्त्री :** अशाप्रकारे मुस्लीम आक्रमकांच्या पूर्वी हिन्दू समाजातील स्त्रियांची अवस्था अतिशय निराशाजनक होती. प्राचीन काळात मात्र स्त्रीला स्वातंत्र्यता व सन्मानाचा अधिकार मिळालेला होता. यानंतर हळूहळू सामाजिक क्षेत्रामधील त्यांचे अधिकार समाप्त झाले व स्त्रियांच्या नशीबी दयनीय दु:ख निर्माण झालेले होते.

**विवाह :** मध्ययुगीन काळात लहानपणापासूनच मुलीला कुटूंबातील मोठ्या व्यक्तीचा सन्मान करण्याचे शिक्षण दिले जात होते. पतीची ईश्वराप्रमाणे सेवा करणे हेच स्त्रीचे कार्य मानले जात होते. पत्नीला पतीच्या आदेशाचे पालन करावे लागत होते. दु:खाच्या प्रसंगी पतीची सेवा करण्यास तिला वचनबद्ध रहावे लागत होते. पवित्र जीवन व्यतीत करून पतिव्रता धर्माचे पालन या काळात भारतीय स्त्रिया करीत होत्या. गृहस्थ जीवनातील पूर्ण कार्य तिला करावे लागत असे. सकाळी लवकर उठून पीठ दळावे लागत असे व कुटूंबातील सर्व सदस्यांकरिता भोजनाची व्यवस्था करावी लागत असे. विहीरीवर पाणी भरण्याकरिता तिला जावे लागत असे. अशाप्रकारे संपूर्ण वेळ भारतीय स्त्रीचा घरातील कामे करण्याकरिता जात होता.

मुलींच्या विवाहप्रसंगी हुंडा देण्याची पद्धत होती. मुलीचे वडील दागदागिने, हत्ती, घोडे, विलासी उपभोग्य वस्तू आणि नोकरसुद्धा मुलीसोबत दिले जात होते. अशा प्रकारची प्रथा श्रीमंत हिन्दू वर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर होती. श्रीमंत लोक कमी वयाच्या मुलीसोबत विवाह करून त्यांना आर्थिक संपत्ती देत होते. याच काळात गरीब मुलींची खरेदीसुद्धा होत होती. मध्यकाळात हुंडा घेण्याची प्रथा बंगाल प्रांतामध्ये सर्वात जास्त होती. पुरूष आणि स्त्री वर्गातील विवाहाचे वय ३० आणि १२, २८ आणि ०८, ३० आणि १०, २१ आणि ०७ या क्रमानुसार राहत होते. योग्य पती न मिळाल्यास पत्नी वडिलांच्या घरी राहून आयुष्य व्यतीत करीत होती. युवती तारूण्यात पदार्पण करण्यापूर्वीच विवाह केला जात होता. योग्य पती न मिळाल्यास मुलगी स्वयंवरच्या प्रथेनुसार पतीची निवड करत असे. मुस्लीम आक्रमणानंतर भारतात बालविवाह प्रथा निर्माण झाली असावी असे अल्बेरूनी याने म्हटले आहे.

डॉ. रेखा मिश्रा सांगतात की, "बालविवाह ही मुघल काळातील एक विशेषता मानली जात होती. मुलींचा विवाह ९ किंवा १० वर्षातच होत होता. स्त्रियांचे जीवन चार भिंतीमध्ये निर्धारित होते." हिन्दू आणि मुस्लीम समाजामध्ये विवाह कमी वयातच केले जात होते. सम्राट अकबराने विवाहाची वयोमर्यादा मुलांची १६ वर्ष व मुलीची १४ वर्ष निर्धारीत करण्याचा प्रयत्न केला होता, पण यात त्यांना यश आले नाही. मुलीचे वडील विवाहमधील संपूर्ण तत्वांचे पालन करीत होते. विवाहप्रसंगी दोन्ही कुटूंबात मंगलमय वातावरण निर्माण होत असे. संगीत, फुलांचे हार, रोषणाई इत्यादीच्या माध्यमातून मंगलमय समारंभ विवाहप्रसंगी होत होते.[3] विवाहाच्या प्रसंगी पुरोहित मंत्रांचे पठण करीत होते. अशाप्रकारे विवाहाची प्रथा मध्ययुगात निर्माण झालेली होती.

**मध्ययुगकालीन सती प्रथा :** मध्ययुगात हिन्दू स्त्रीची सर्वात मोठी विपत्ती म्हणजे पतीचा मृत्यूही होती. निम्न वर्गातील स्त्रियांना सोडून हिन्दू विधवा स्त्रीला पुनर्विवाह करण्यास अनुमती नव्हती. विधवा स्त्रिला आपल्या पतीच्या मृत शरीराबरोबर अग्नीप्रवेश करावा लागत होता. असे न केल्यास त्या स्त्रीला समाजात अपमानास्पद व दु:खपूर्ण जीवन व्यतीत करावे लागत होते. जी स्त्री सती होण्यास नकार करीत होती, त्या स्त्रिकडे समाज घृणेच्या नजरेने बघत होता. लांब केस ठेवण्याची अनुमती नव्हती. चांगले वस्त्र, आभूषण परिधान करू शकत नव्हती. स्वेच्छानुसार सती जाण्याची प्रथा प्राचिन काळापासूनच समाजात सुरू होती. कालांतराने विधवा स्त्रिला तिच्या इच्छेविरूद्ध अग्नीमध्ये प्रवेश करण्यास विवश केले जात होते. विदेशी यात्रेकरू विचारवतांनी या सती प्रथेवर वर्णन केले आहे.

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

सती प्रथेविषयी अल्बेरूनी लिहितो की, समाजात सतीप्रथा प्रचलीत होती, पण विधवेला अग्नीप्रवेशाकरिता मजबूर केले जात नसे. अनेक विधवा वैधव्यपूर्ण जीवन कंठित होत्या. मनुस्मृतीनुसार विधवांनी आपल्या मृतपतीसोबत अग्नीप्रवेश करणे अनिवार्य समजण्यात येत होते. पतीचा मृत्यू दूर देशी झाला. तर त्याच्या हाडासोबत विधवा अग्नीप्रवेश करीत होत्या. हाडे मिळाली नाही तर सांकेतिक रूपाने पतीचा पुतळा बनविला जात असे व विधवेला पुतळ्यासोबत अग्नीप्रवेश करावा लागत असे. या प्रथेला "अनुमरण" म्हटले जात होते. धार्मिक ग्रंथानुसार सती जाणाऱ्या स्त्रीला स्वर्ग प्राप्त होतो अशी कल्पना होती. विधवांकरिता आत्मदहन हेच कर्तव्य होते. निम्न वर्गातील स्त्रिया या प्रथेला मानत नव्हत्या. सतीप्रथेची प्रथा प्राचीन भारतात अस्तीत्वात होती. एकपेक्षा जास्त पत्नी असला तर मुख्य पत्नी पतीसोबत अग्नीप्रवेश करीत होती. केव्हा केव्हा सर्व पत्नी कटूता व वैमनस्येला विसरून मृत पतीच्या चितेवर एकाचवेळी अग्नीप्रवेश करीत असत. सती होण्यापूर्वी विधवा स्नान करून, सुंदर वस्त्रे परिधान करून, एका हातामध्ये नारळ व आरसा घेऊन, घोड्यावर बसून, वाजंत्री वाजवून, नगरामधून मिरवणूक काढून सती जात होती. सोबत एक पुरोहित सुद्धा राहत होता. अग्नीदेवतेचे पूजन केले जात होते. सतीप्रथा इतकी प्राचीन होती की, मुस्लीम शासकांना ती रोखता आली नाही. त्यांना वाटत होते की, ईश्वराचा कोप होऊन मुस्लीम शासकाला नष्ट करेल, म्हणून या प्रथेविरूद्ध आवाज मुस्लीम शासकांनी उठविला नाही. या अमानुष प्रथेविरूद्ध कोणताही नियम बनविला गेला नाही. हुमायूने या प्रथेमध्ये संशोधन करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तत्कालीन धर्मप्रमुखांनी ह्यात हस्तक्षेप करून व धार्मिक भावना दुखावल्या जाऊ शकतील अशा कारणाने विरोध दर्शविला होता. यानंतर सम्राट अकबराने सतीप्रथेला रोखण्याकरिता नवीन आदेशाची निर्मिती केली होती व सती होण्याकरिता कोणत्याही विधवा स्त्रीला विवश केले जावू नये असे बजावले. सम्राट जहाँगीरनेसुद्धा या प्रथेला रोखण्याचे निर्देश दिले होते. पण त्यालाही सफलता प्राप्त करता आली नाही. १६६३ मध्ये औरंगजेबने सतीप्रथा समाप्त करण्याचा आदेश दिला होता. ज्या विधवेला संतान नसेल तर ती विधवा सती जावू शकत होती. मात्र संतान असलेली विधवा सती जात नव्हती. अबुल फजल म्हणतो की, समाजात पतीला प्रतिष्ठीत वागणूक मिळावी म्हणून सती जाण्याची प्रथा होती. काही विधवा स्त्रीला जबरदस्तीनेसुद्धा सती जावे लागत होते. सतीप्रथेमुळे इस्लामी समाजही प्रभावित झालेला होता.

**आत्महदन (जोहार) :** जोहाराची प्रथा राजस्थानमध्ये मोठ्या प्रमाणावर होती. जेव्हा राजपूत मुसलमानांच्याद्वारे पराजित होत होते तेव्हा कुटूंबातील स्त्रिया व मुलांना एका घरामध्ये ठेवून आग लावली जात होती. शत्रूकडून पराभव झाला तर आत्मदहनसुद्धा अनेक राजे करीत होते. रणथम्भोरचे राजे राणा हमीर देव अलाउद्दीन खिलजीकडून पराभूत झाल्यानंतर जौहार केला होता. सम्राट बाबरच्या काळात चन्देरीच्या मेदिनी रायने मुगलाकडून पराभूत झाल्यावर आपल्या कुटूंबातील सर्वच सदस्यांना मारून टाकले होते. स्वाभिमानी राजपूत राजे शत्रूच्या हातून अपमानीत होण्यापेक्षा अमानुष व्यवहारापासून बचाव करण्यापेक्षा आत्मदहन करणे पसंत करीत होते. जौहारच्या या प्रथेमुळे मुस्लीम समाजही प्रभावित झालेला होता. जेव्हा तैमूरने भारतावर आक्रमण केले, तेव्हा अनेक मुस्लीम समाजाने तैमूरच्या क्रोधापासून बचाव करण्याकरिता जोहार केला होता.[४] जेव्हा बहादूरशाहने चित्तोडवर आक्रमण करून विजय मिळविले, तेव्हा राणी कर्णावतीने हजारो स्त्रियांना सोबत घेऊन जोहार केला होता. दक्षिण भारतात जोहारप्रती उदासीन भावना दिसून येते. राजस्थानमध्ये जोहार मोठ्या प्रमाणावर केला जात होता.

**देवदासी प्रथा :** मध्ययुगीन काळात हिन्दू मंदिरामध्ये देवदासी प्रथा प्रचलित होती. प्रारंभी पुरोहितांनी या प्रथेचा विरोध केला होता. राजे - महाराजे - श्रीमंत लोकांनी भक्तीसंगीत, नृत्य करण्याकरीतासुद्धा स्त्रियांना मंदिरात ठेवले होते. अलाउद्दीन खिलजीच्या काळात देवदासींची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली होती. या स्थितीमध्ये

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

63
ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

सुधार करण्याकरीता देवदासीसोबत विवाह करण्याची प्रथा निर्माण झाली होती. याच काळात "दास" प्रथाही निर्माण झालेली होती. एका राज्यातून दुसऱ्या राज्याला अनेक दासी भेट म्हणून दिल्या जात होत्या. मुहम्मद तुघलकाने १०० दासी चीनच्या सम्राटला पाठविल्या होते. डॉ. यू. ए. घोषाल म्हणतात की, मुस्लीम सम्राटाला हिन्दू स्त्रिया गुलाम म्हणून सेवेस ठेवण्यात अती आनंद वाटत होता. सुंदर स्त्रियांना गुलाम बनवून नृत्य करण्याकरिता दरबारी ठेवण्याची प्रथा - परंपरा निर्माण झाली होती.

अशाप्रकारे मध्ययुगीन काळात हिन्दू स्त्रीची अवस्था दयनीय होती. याच काळात हिन्दू स्त्री जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत पुरुष वर्गाच्या अधीन व आश्रीत होती.

**मध्ययुगकाळातील स्त्रियांची समाजकारणातील भूमिका :** समाजातील कोणत्याही संस्कृतीचे मूल्यमापन स्त्रियांच्या परिस्थितीवरून लावले जाते. प्राचीन काळातही अनेक स्त्रियांनी योग्यरित्या प्रशासन चालविले होते. पूर्व - मध्ययुगीन काळात सम्राट हर्षवर्धनाच्या बहिणीने - राजश्रीने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर प्रशासन सांभाळले होते. राजपूत काळातही अनेक राजपूत स्त्रियांना प्रशासन चालविण्याचे प्रशिक्षण दिले जात होते. काश्मिर आणि दक्षिण भारतातसुद्धा अनेक स्त्रियांनी प्रशासनात आपली ओळख पटविली होती. राजदरबारात स्त्रिया अनेक प्रकारांनी प्रशासनात मदत करीत होत्या.

**ऐतिहासिक आणि वर्तमान भारतीय स्त्री :** अंगरक्षणाचे कार्यही स्त्रिया करीत होत्या. राजमहालातील उत्सवाप्रसंगी संगीत, नृत्य करून स्त्रिया आपल्या कलागुणांचा परिचय करून देत होत्या. शत्रूच्या प्रदेशामध्ये गुप्तचर म्हणून स्त्रियांना कार्य करावे लागत होते. राजासोबत शिकारपण अनेक स्त्रिया करीत होत्या. मुगलकाळात राणासंगाची पत्नी कर्णावतीने प्रशासनामध्ये कौशल्य दाखविले होते. याच काळात राणी दुर्गावतीने पतीच्या मृत्यूनंतर राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली व योग्य प्रशासन चालवून विद्रोहींना नष्ट करून दाखविले. सम्राट अकबराशी वीरतेने ती लढली व पराजीत होत असल्यामुळे तिने आत्महत्या केली होती.

मध्यकाळात हिंदू समाजात स्त्रियांची प्रतिष्ठा कमी झाली होती. प्राचीन काळापासूनच स्त्रियांना शिक्षण देण्याविषयी प्रतिबंध निर्माण झाले होते. स्त्रियांना वेदाचे अध्ययन करण्याची मनाई होती. परदा पद्धती व बालविवाहाच्या कारणामुळे त्यांची स्वातंत्र्यता समाप्त झालेली होती. या कारणामुळे स्त्रियांना अधिक शिक्षण प्राप्त करता आले नाही. गृहस्थ जीवनापुरतेच शिक्षण त्यांना घरातून मिळत होते. मनुस्मृतीमध्ये वर्णन केले आहे की, स्त्रीने धनसंचय करून घर खर्च चालवावा, घराची स्वच्छता राखावी, धार्मिक कृत्यात भाग घ्यावा, पाककलेमध्ये निपुणता प्राप्त करावी. अशा प्रकारचे शिक्षण स्त्रियांना आईकडून प्राप्त होत होते. विवाहानंतर पतीच्या घरूनही संसारविषयक शिक्षण स्त्रीला प्राप्त होत असे. कुटूंबातील आर्थिक खर्चाचा हिशोब ठेवण्याकरिता मौखिक गणिताचे ज्ञान स्त्रियांना मिळत होते. अशाप्रकारे घरातील कामकाजासंबंधीचे शिक्षण स्त्रियांना मिळत होते. मेगॅस्थनिज लिहितो की, ब्राह्मण आपल्या घरातील स्त्रियांना दर्शनशास्त्राचे ज्ञान देत नव्हते. सामान्यत: हिंदू स्त्रीला साहित्यशास्त्र, तर्कशास्त्र, संगीत, नृत्य इत्यादीचे शिक्षण दिले जात होते. श्रीमंत व राजघराण्यातील स्त्रियांना अनेक प्रकारची सुविधा मिळत होती. सामान्यवर्गातील स्त्रिया निरक्षर होत्या.

मध्ययुगीन काळात मुलींकरिता वेगळ्या शाळा नव्हत्या. श्रीमंत कुटूंबातील लोक मुलांच्या शिक्षणाकरिता घरी तज्ज्ञ व्यक्तीची निवड करून त्यांच्या माध्यमातून शिक्षण प्राप्त करून घेत होते. काही स्त्रियांना उच्च कोटीचे शिक्षण मिळाले होते. भरतचंद्रने आपल्या पुस्ताकामध्ये लिहिले की, राजमुकारी विद्या विद्वान विदुषी होती. दुसरी स्त्री इच्छावती साहित्य, कविता व संगीतामध्ये प्रविण होती. रूक्मिणी व्याकरण, पुराण, स्मृती शास्त्र, वेद आणि वेदांगामध्ये पारंगत होती. मध्ययुगामध्ये अनेक नर्तकी नृत्यामध्ये निपुण होत्या. राजा मानसिंहची पत्नी मृगनयनी संगीतामध्ये अत्यंत निपुण होती. अकबराच्या काळात संगीत विशारद स्त्रिया होत्या.

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep



ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

**भक्ती आंदोलनामध्ये स्त्रीची भूमिका :** मध्ययुगामध्ये अनेक स्त्रियांनी भक्ती आंदोलनामध्ये उल्लेखनीय कार्य केले होते. ईश्वराविषयी आध्यात्मिक प्रेम सर्वत्र निर्माण होत होते. प्राणनाथ कवीची पत्नी इन्दुमतीने सन १५४९ मध्ये काही दोहे लिहून भक्ती आंदोलनाची सुरूवात केली होती. सम्राट अकबराच्या काळात गंगा, जमुना, कालमशी देवी, रानरूधारी आणि नवलादेवी इत्यादी विदुषी भक्ती व काव्य आंदोलनामध्ये मग्न होत्या. याच काळात दयाबाई या प्रख्यात कवयित्री होऊन गेल्या. १८ व्या शतकामध्ये "दयाबोध" आणि "विनय मालिका" हे दोन काव्यसंग्रह तिने निर्माण केले होते. सगुण ईश्वरावर विश्वास ठेवणारी कृष्णभक्त कवयित्री व उदयपूरच्या राणा भोजची पत्नी मीराबाई यांचाही प्रामुख्याने समावेश होता. संत मीराबाईने अनेक ग्रंथांची निर्मिती केली होती. "गीतगोविंद", "रामगोविंद" गर्वगीत व स्फुट पद इत्यादी. सम्राट अकबराच्या समकालीन बावरी साहिब नावाची कवयित्री होती. तिनेही हिन्दी व उर्दु भाषांमध्ये परंपरागत अनेक रचना केल्या होत्या. सोनकुमारी अंबेर या कवयित्रीचे "स्वर्णबेली" नावाचे पुस्तक प्रसिद्ध होते. रामभक्त कवयित्री ओरछा राज्याची मधुर अली आणि बंगालची चंद्रावती इत्यादीचा उल्लेख करण्यात येतो. मधुर अलीने "रामचरित", "गणेश देवलीला" या नावाचे पुस्तक लिहिले होते. चंद्रावती ही प्रसिद्ध कवी बंसीदासची मुलगी होती. चंद्रावतीने रामायणाची रचना केली होती, ज्यामध्ये मौलिकता आणि सुंदरतेचा संगम झालेला होता.

मुगल काळामध्ये अनेक स्त्रियांनी श्रृंगारकाव्य निर्माण केले होते. यामध्ये रूपमतीने सुंदर काव्याची निर्मिती केली होती. अनेक हिंदू स्त्रियांनी विविध विषयांवर कविता लिहिल्या होत्या. संत तुलसीदासाच्या पत्नी रत्नवलीने अनेक दोहे लिहिले होते. सतराव्या शतकामध्ये कवी केशवदासची पुत्रवधू राणी कुंजीने अनेक काव्यरचना केल्या होत्या. बिकानेरचे राजे पृथ्वीराजच्या पत्नी चम्पाराणीने काव्यवरचना करून पतीलाही काव्यरचना करण्यास प्रवृत्त केले होते.

भारतात मुसलमानी सत्ता स्थापने नंतर मुस्लिम संस्कृतीचा भारतीय समाज जीवनावर प्रभाव पडल्यानंतर त्याचे परिणाम तत्कालिन हिंदू समाजातील स्त्री जीवनावर उमटलेले दिसून येतात. दिल्लीच्या सुलतानशाही व मुघलशाहीच्या परंपरा संस्कृतीचा प्रभाव हिंदू स्त्री - जीवनावरही पडला स्त्रियांनी उपभोगावयाचे स्वातंत्र्य, हक्क शिक्षण इत्यादींबाबत पुर्वीच्या सनातनी हिंदू समाजाची प्रवृत्ती धार्मिक दृष्ट्या अधिक सनातनी बनली परिणामी हिंदू समाजातील स्त्रीचा सामाजिक दर्जा अधिकच घसरला असे लक्षात येते.

**संदर्भ साधने :**

१) जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, १९८५.
२) डॉ. देशपांडे व्ही. टी, भारताचा इतिहास मध्ययुगीन, विद्याप्रकाशन, नागपूर, २००३.
३) Chaurasia R. S, History of Medieval Indian, Educational Publisher, Delhi, १९९६.
४) डॉ. महाजन टी. टी, भारतीय स्त्री जीवनाची वाटचाल, यशवंतराव चव्हाण महराष्ट्र मुक्तविद्यापीठ, नाशिक.